Jagdamba Education Society's
Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401
Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

# * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 23/05/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे



केशवराव भोळे हे मराठीतील प्रसिद्ध संगीतसमीक्षक, संगीतरचनाकार, संगीतदिग्दर्शक आणि नाटक, चित्रपट, क्रिकेट इत्यादी विषयांचे चिकित्सक अभ्यासक व लेखक होते. त्यांचा जन्म २३ मे १८९६ रोजी अमरावती येथे झाला. त्यांच्या वडिलांना संगीताची आवड होती. ते स्वत: सतार वाजवीत असत. केशवरावांचा जन्म होण्यापूर्वीच त्यांचे वडील वारले, तथापि घरातील संगीतमय वातावरणामुळे केशवरावांना लहानपणापासूनच नाटक-संगीतादी पाहण्या-ऐकण्याचा छंद लागला आणि तो वाढत जाऊन अखेरपर्यंत टिकला. वैद्यकीय अभ्यासासाठी ते मुंबईस आल्यावर या छंदाला खोली आणि चौरसपणा येऊन तो इतका वाढला की, त्यांनी वैद्यकीय अभ्यासावर पाणी सोडले.

१९३३ मध्ये गोविंदराव टेंबे यांच्यानंतर केशवरावांनी 'प्रभात' या सिनेमा कंपनीत संगीतदिग्दर्शक म्हणून प्रवेश केला. 'प्रभात' कालखंडात केशवरावांची स्वररचनाकाराची वृत्ती फुलून आली. हा बहर 'अमृतमंथन', 'संत तुकाराम', 'कुंकू', 'माझा मुलगा', 'संत ज्ञानेश्वर', 'संत सखू', 'चंद्रसेना' इत्यादी बोलपटांमधील गीतांच्या त्यांनी केलेल्या स्वररचनांमध्ये आणि संगीताच्या दिग्दर्शनामध्ये भरपूर दिसून येतो, त्याखेरीज कित्येक सुट्या भावगीतांनाही त्यांनी चाली लावल्या. पुढे ते आकाशवाणी मुंबई केंद्राच्या संगीतविभागाचे प्रमुख झाले. 'एकलव्य' या टोपणनावाने त्यांनी वसुंधरा या साप्ताहिकात लिहिलेले अभिजात गायक-गायिकांविषयीचे अनेक लेख त्यांच्या रमणीय शैलीमुळे आणि माहीतगीरीमुळे लोकप्रिय झाले. तेच लेख पुढे आजचे 'प्रसिद्ध गायक' या पुस्तकात संग्रहीत करण्यात आले. या पुस्तकाची सुधारून वाढविलेली आवृत्ती म्हणजे 'संगीताचे मानकरी' होय. त्यांनी नंतर 'शुद्धसारंग' याही टोपणनावाने लेख लिहिले. 'आवाजाची दुनिया', 'अस्ताई', 'वसंतकाकाची पत्रे', 'माझे संगीत', 'अंतरा' आणि 'जे आठवते ते' हे आठवणीवजा आत्मचरित्र ही त्यांची ग्रंथसंपदा आहे. अशा या प्रसिद्ध संगीतसमीक्षकाचे ९ नोव्हेंबर १९७७ रोजी निधन झाले.

Nashik Edition

May 23, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * CENTRAL LIBRARY * YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401